Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

13/२०२२

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीचा जास्तीजास्त वापर करून कार्यालयीन कामकाजामध्ये कागदाचा कमीत कमी वापर करण्यात यावा. तसेच, निरूपयोगी कागद-कचरा न जाळता तो पुनर्वापरासाठी ठेकेदारानां देण्याकरिता विद्यापीठातील मुद्रणालय विभागाकडे देण्यात यावा.

तसेच, कार्यालयातील विजेची बचत करणे आवश्यक आहे त्याकरिता कार्यालयातील/संबधित खोलीमधील लाईट व विद्युत उपकरणे आवश्यक असतील तेंव्हाच सुरू ठेवावीत, दुपारच्या सुट्टीमध्ये व कार्यालय बंद असताना अनावश्यकवेळी कार्यालयातील/संबधित खोलीमधील लाईट व विद्युत उपकरणे बंद ठेवावीत. तसेच, विद्यापीठ परिसरामधील इमारतीच्या बाहेरील, इमारतीच्या व्हरांडयामधील, उद्यान, रस्ते अशा ठिकाणची लाईट वेळेत सुरू करून वेळेत बंद करण्यात यावीत. उपरोक्त सुचनाचे पालन करून विजेची बचत करण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना सर्वांनी कराव्यात.

प्र. कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. आस्थापना/ 842
दि. 29 MAR 2022

प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) अधीक्षक - शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय विभाग
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

- **विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.**